# राज्य जैव विविधता मंडळावर जाधव



कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य जैविक विविधता नियम २००८ (सुधारणा २०१६ ) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य जैविक विविधता मंडळावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यात डॉ. अधिकराव जाधव यांचा समावेश आहे. जाधव हे शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागात कार्यरत आहेत.

राज्य जैविक विविधता नियमातील तरतुदीनुसार राज्यात जैविक विविधता मंडळ स्थापन करण्यात आले आहे. जैवविविधतेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी, तिचा वापर करताना जैव विविधता टिकून राहील तसेच जैविक साधनसंपत्तीच्या वापरातून प्राप्त झालेल्या लाभाचे समन्यायी वाटप होण्याच्यादृष्टीने पाच अशासकीय सदस्यांची नियुक्ती करावयाची होती. त्याप्रमाणे या नियुक्त्या करण्यात आल्या असून यामध्ये डॉ. जाधव यांच्यासह डॉ. जयंत वडतकर, अंकुर पटवर्धन, आरती शनाबरे, विनय देशमुख यांचा समावेश करण्यात आला आहे.

2 MAR 2017 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात दृष्टीहीन व्यक्तींसाठी भरविण्यात आलेल्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत अन्य मान्यवर.

# विद्यापीठात दृष्टीहिनांसाठी उपयुक्त साधनांचे प्रदर्शन

प्रतिनिधी

कोल्हापूर

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात दृष्टीहिन व्यक्तींसाठी ग्रंथ व ब्रेल वाचनाकरिता उपयुक्त साधनांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनात दृष्टीहीन विद्यार्थ्यांकरीता उपयुक्त माहिती व तंत्रज्ञानावर आधारित विविध साधने, सायन्स व टेक्नॉलॉजी विषयांवरील ग्रंथ तसेच ब्रेल लिपीतील पुस्तके व श्राव्य माध्यमांचा समावेश आहे. प्रदर्शनाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शासनाने या वर्षी 'दिव्यांग व्यक्तींसाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर' असा विषय निवडला आहे. त्यानुसार या प्रदर्शनात ब्रेल बुक्स, ७५ पेक्षा अधिक माहिती व तंत्रज्ञान विषयाशी संबंधित पुस्तके तसेच अंध व कमी दृष्टी असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त साधनांचा समावेश आहे. यामध्ये सी.सी.टी.व्ही. सिस्टीम विदाऊट टी.व्ही. मॉनिटर, डिरेक्टरी रिडर, ऑन स्क्रिन रिडिंग सॉफ्टवेअर, हॅन्डहेल्ड मॅफियर्स, इल्युमिनेटेड मॅफियर्स, वर्तमानपत्र वाचनाकरिता नेक मॅफियर, टेलिस्कोप, अंधाकरिता कि बोर्ड, कि बोर्ड लर्निग सॉफ्टवेअर, हिंदी व मराठी ओ.सी.आर. स्कॅनिंग सॉफ्टवेअर, नोट टेकर मशिन, झूम ऑफिससहित पर्ल कॅमेरा, इत्यादी साधनांचा समावेश आहे.

दरम्यान, राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ३ मार्च रोजी ग्रंथालयाने सातवी ते दहावीच्या अंध विद्यार्थ्यांकरिता ब्रेल वाचन स्पर्धा आयोजित केली आहे. प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिस देण्यात येणार असल्याची माहिती डॉ. खोत यांनी दिली. उद्‌घाटनप्रसंगी डॉ. धनंजय सुतार, प्रा. डॉ. पी. एस. पाटील, एस. आर. बिरजे, डॉ. आर. डी. खामकर, ए. बी. मातेकर, धनंजय गुरव, पाटील एस. एस. आदी उपस्थिंत होते.

## गणित अधिविभागात विज्ञान दिन

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागाने दोन दिवसीय विशेष राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. यामध्ये मुंबईच्या प्रा. कोळवणकर यांनी 'डिफ्रन्शियल इक्वेशन्स ॲन्ड डायनॅमिकल सिस्टीम्स' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिविभाग प्रमुख डॉ. एल.एन. काटकर, जे. पी. खराडे–थोरवे, डॉ. के.डी. कुच्चे, डॉ. एम.टी. गोफणे, डॉ. एस.एस. भालेकर, एस. एस. मित्रगोत्री, जे.पी. भोसले, एस.एस. कुंभार आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात ब्रेल वाचनाच्या साधनांचे प्रदर्शन सुरु

**कोल्हापूर :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब ग्रंथालयात दृष्टीहीन व्यक्तींसाठी ग्रंथ व ब्रेल वाचनाकरिता उपयुक्त साधनांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शुक्रवार (दि. ३)पर्यंत हे प्रदर्शन खुले राहणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी झाले. यावेळी ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. धनंजय सुतार, नॅनो सायन्स विभागातील प्रा. डॉ. पी. एस. पाटील, ग्रंथालयातील एस. आर. बिरजे, आर. डी. खामकर, ए. बी. मातेकर, धनंजय गुरव, आदी उपस्थित होते. दरम्यान, राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ३ मार्चला ग्रंथालयाने अंध विद्यार्थ्यांकरिता ब्रेल वाचन स्पर्धा आयोजित केली आहे. दरम्यान, राष्ट्रीय विज्ञान दिनासाठी शासनाने या वर्षासाठी 'दिव्यांग व्यक्तींसाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर' असा विषय निवडला आहे. त्यामुळे खर्डेकर ग्रंथालयात दृष्टिहीन विद्यार्थ्यांकरिता उपयुक्त माहिती व तंत्रज्ञानावर आधारित विविध साधने, सायन्स व टेक्नॉलॉजी विषयांवरील ग्रंथ तसेच ब्रेललिपीतील पुस्तके व श्राव्यमाध्यमे यांचे प्रदर्शन भरविले आहे. त्यात सी.सी.टी.व्ही. सिस्टीम विदाऊट टी.व्ही. मॉनिटर, डिरेक्टरी रिडर, ऑन स्क्रीन रिडिंग सॉफ्टवेअर, हॅन्डहेल्ड मॅग्निफायर्स, इल्युमिनेटेड मॅग्निफायर्स, वतर्मानपत्र वाचनाकरिता नेक मॅग्निफायर, आदी साधनांचा समावेश आहे. (प्रतिनिधी)


## भित्तीपत्रकांचे प्रदर्शन

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त नॅनो सायन्स व टेक्नॉलॉजी विभागातील ३0 विद्यार्थ्यांचे पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना नॅनो सायन्स व टेक्नॉलॉजीविषयी दाखले देऊन मार्गदर्शन केले. गणित अधिविभागाने विशेष राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. त्यामध्ये मुंबईच्या प्रा. कोळवणकर यांनी 'डिफ्रन्शियल इक्वेशन्स अॅन्ड डायनॅमिकल सिस्टीम्स' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिविभाग प्रमुख डॉ. एल. एन. काटकर, जे. पी. खराडे-थोरवे, के. डी. कुच्चे, एम. टी. गोफणे, एस. एस. भालेकर, एस. एस. मित्रगोत्री, जे. पी. भोसले, एस. एस. कुंभार आदी उपस्थित होते.

# तंत्रज्ञान अधिविभागात विज्ञान दिन

कोल्हापूर, ता. १ : राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात पालक मेळावा झाला. 'इनोव्हेटिव्ह प्रोग्राम फॉर डिफरंटली एल्ड पर्सन्स' या संकल्पनेवर कार्यक्रमात विस्तृत चर्चा झाली.

इंग्रजी विभागातील प्रा. मनोहर वासवानी यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे अपंग तसेच विकलांग व्यक्तींच्या आयुष्यातील महत्त्व विशद केले. २१ व्या शतकात तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अपंग व्यक्तींचे आयुष्य सुसह्य झाल्याचेही त्यांनी सांगितले. परदेशातील अपंगांसाठीच्या सुविधा, ब्रेल लिपी याबाबतही त्यांनी माहिती दिली. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनीही मार्गदर्शन केले. कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. ए. के. साहू, प्रा. एस. बी. चव्हाण, प्रा. ए. ए. शिरोळकर, प्रा. ए. ए. डूम, प्रा. जी. एस. पाटील, प्रा. पी. व्ही. सावंत, संपत कांबळे आदी उपस्थित होते. दुर्गेश्वरी माळगे, सरोज माने यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात विज्ञान दिनानिमित्त झालेल्या पालक मेळाव्यात बोलताना प्रा. मनोहर वासवानी.

# एस. इंद्रकांत : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाच्या चर्चासत्राला प्रारंभ

# पायाभूत सुविधांच्या माध्यमातून विकास शक्य

**कोल्हापूर :** आपल्या देशाला सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी देशातील दुर्लक्षित, अविकसित व आर्थिकदृष्ट्या मागास प्रदेशाचा विकास करणे अनिवार्य आहे. त्यासाठी मुलभूत व पायाभूत सेवा-सुविधांची उपलब्धता करणे हाच एकमेव उपाय आहे, असे प्रतिपादन उस्मानिया विद्यापाठातील प्रा. डॉ. एस. इंद्रकांत यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर होते. चर्चासत्राचा विषय 'सर्वसमावेशक विकास : भारत कुठे आहे?' असा आहे. डॉ. इंद्रकांत म्हणाले, भारतीय स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा विचार केल्यास असे




**शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी स्मरणिकेचे प्रकाशन प्रा. डॉ. एस. इंद्रकांत व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून डॉ. रमेश गोलौत, प्रा. पी. एस. कांबळे, विद्या कट्टी उपस्थित होत्या.**

दिसून येते की, देशात समाधानकारक असा पायाभूत सेवा-सुविधांचा विकास झाला नाही. शेती व शेती आधारित व्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग, लघुद्योग, वित्तीय संस्था यांचा अपुरा विकास होण्यामागे पायाभूत सेवा-सुविधांची कमतरता हे प्रमुख कारण दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ज्या कृषी ग्रामीण भागावर अवलंबून आहे त्या भागाच्या विकासासह शिक्षण, जलसिंचन, वित्तीय सेवा, वाहतूक व दळणवळण, आरोग्य सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान यासारखा घटकांचा विकास गरजेचा आहे. कार्यक्रमास आर.बी.आय. मुंबई कार्यालयाचे सहायक आर्थिक सल्लागार डॉ. रमेश गोलौत, आर. जी. दांडगे, व्ही. बी. ककडे, एम. एस. देशमुख, एस. टी. कोंबडे, एस. पी. पंचगल्ले आदी उपस्थित होते. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. कविता वड्राळे यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. विद्या कट्टी यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

## कल्याणकारी दृष्टीतून खर्च करावा

सरकारने पायाभूत क्षेत्राच्या विकासासह अशा कल्याणकारी दृष्टिकोनातून खर्च करावा की, त्यामुळे अर्थव्यवस्थेत ज्ञान, कौशल्याचे सर्वसमावेशी, विकासात्मक आंतरिक सहसंबंध तयार होतील. याशिवाय सदृढ, सशक्त भारताच्या उभारणीसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून वितरित केले जाणारे अन्नधान्य हे संख्यात्मक, गुणात्मक दृष्टीने उच्चप्रतीचे असावे, असे डॉ. इंद्रकांत यांनी सांगितले.

2 MAR 2017
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संभाजीराजेंनी जागवल्या क्रिकेटच्या आठवणी

## शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

क्रिकेट हे माझं फॅशन आहे. शिवाजी विद्यापीठाच्या याच मैदानावर मी क्रिकेट खेळलो. कित्येक सामन्यांचा आनंद घेतला. सागर पवारसारखा क्रिकेटपटू मित्र याच मैदानावर लाभला, अशा आठवणी खा. संभाजीराजे छत्रपती यांनी जागवल्या. निमित्त होते शिवाजी विद्यापीठात आयोजित अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनाचे. खा. संभाजीराजे यांनी यावेळी मैदानात उतरून आपल्या बॅटिंगची झलकही उपस्थितांना दाखविली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बॅटिंग करताना खा. संभाजीराजे.**

शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर बुधवारी सकाळी या राज्यस्तरीय स्पर्धेचे उदघाटन खा. संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. केवळ क्रिकेटवरील प्रेमापोटी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा मोह आपण टाळू शकलो नसल्याचे सांगून खा. संभाजीराजे म्हणाले, राजाराम महाविद्यालयात शिकत असताना विद्यापीठाचे क्रिकेट मैदान हे आमच्या आवडीचे ठिकाण होते. कधी खेळायला, तरी कधी सामने पाहायला या मैदानात आम्ही नेहमी येत असू. कर्मचाऱ्यांच्या क्रीडा गुणांना चालना देण्याच्या दृष्टीने अशा स्पर्धांचे आयोजन विद्यापीठ पातळीवर होणे ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. अशा स्पर्धा नियमितपणे आयोजित व्हाव्यात, या दृष्टीने सरकार स्तरावर काही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल, तर त्यासाठी आपण विद्यापीठास सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, लहानपणी मनमोकळेपणाने खेळांचा आनंद घेणारे आपण नोकरी-व्यवसायात आलो की खेळ आणि खिलाडूवृत्ती या दोन्ही गोष्टी विसरून जातो. क्रिकेट स्पर्धेत सहभागी विद्यापीठांच्या संघांनी संचालनाद्वारे मान्यवरांना मानवंदना दिली. यावेळी शिवाजी विद्यापीठातील निवृत्त ज्येष्ठ क्रिकेटपटूंचा सत्कार करण्यात आला. क्रीडा अधिविभागातील शशिकांत दाभाडे यांनी खास स्पर्धेसाठी सजविलेल्या दुचाकीचे अनावरणही खा. संभाजीराजे यांच्या हस्ते झाले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी आभार मानले. यावेळी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, पी. ए. तथा बाबा सावंत, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष रमेश शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### राजे मैदानात!

मुख्य कार्यक्रमानंतर खा. संभाजीराजे यांनी मैदानात उतरून आपल्या क्रिकेटचे दर्शन घडविले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांच्या गोलंदाजीचा त्यांनी लीलया सामना केला. राजेंची बॅटिंग पाहून कुलगुरू डॉ. शिंदे यांनीही बॅट हाती घेऊन काही चेंडू टोलवले. यावेळी सागर पवार या विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या आपल्या मित्राच्या अंगी राष्ट्रीय क्रिकेट संघात जाण्याइतकी क्षमता होती, असे खासदार संभाजीराजे यांनी सांगितले.

2 MAR 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

## खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते उद्घाटन - एसआरटीएमयु नांदेड संघाची विजयी सलामी





**कोल्हापूर : विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० स्पर्धेचे उद्घाटन खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया : इम्रान गवंडी)**

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्रिकेट हे माझं पॅशन आहे. शिवाजी विद्यापीठाच्या याच मैदानावर मी क्रिकेट खेळलो. कित्येक सामन्यांचा आनंद घेतला. सागर पवारसारखा क्रिकेटपटू मित्र याच मैदानावर लाभला, अशा क्रिकटच्या आठवणींना खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी उजाळा दिला. निमित्त होते शिवाजी विद्यापीठात आयोजित अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनाचे! खासदार संभाजीराजे यांनी यावेळी मैदानात उतरून आपल्या बॅटिंगची चुणूकही उपस्थितांना दाखविली. शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर बुधवारी सकाळी या राज्यस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. उद्घाटनाच्या झालेल्या सामन्यात एसआरटीएमयु नांदेड संघाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव संघावर ४ विकेटने मात करून विजयी सलामी दिली. यावेळी शिवाजी विद्यापीठातील निवृत्त ज्येष्ठ क्रिकेटपटूंचा सत्कार करण्यात आला. नांदेडच्या संघाने कोल्हापूर संघातील क्रिकेटपटू अजय आयरेकर यांचा त्यांच्या आतिथ्यशीलतेबद्दल सत्कार केला. क्रीडा अधिविभागातील शशिकांत दाभाडे यांनी खास स्पर्धेसाठी सजविलेल्या दुचाकीचे अनावरणही संभाजीराजे यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी आभार मानले.

### राजे मैदानात! ...

मुख्य कार्यक्रमानंतर खासदार संभाजीराजे यांनी मैदानात उतरून क्रिकेटवरील प्रभुत्वाचे दर्शन घडविले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांच्या गोलंदाजीचा त्यांनी लीलया सामना केला. राजेंची बॅटिंग पाहून कुलगुरू डॉ. शिंदे यांनीही बॅट हाती घेऊन काही चेंडू टोलविले. यावेळी सागर पवार या विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या आपल्या मित्राच्या अंगी राष्ट्रीय क्रिकेट संघात जाण्याइतकी क्षमता होती, असे जाहीर कौतुकोद्गार संभाजीराजे यांनी काढले.

2 MAR 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : विद्यापीठ कर्मचारी टी-२० क्रिकेट स्पर्धेचे बुधवारी उद्घाटन करताना खासदार संभाजीराजे. शेजारी कुलगुरू देवानंद शिंदे, डी. आर मोरे, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे आदी.

# नांदेड विद्यापीठ संघाची जळगाव संघावर मात

## विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या टी-२० स्पर्धेस सुरवात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठ येथे आजपासून विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० स्पर्धेस सुरवात झाली. नांदेड संघाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघावर मात करून विजयी सलामी दिली. खासदार संभाजीराजे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, बीसीयूडीचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, विभागप्रमुख पी. टी. गायकवाड आदींच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. राज्यभरातील विद्यापीठांचे संघ स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

उत्तर महाराष्ट्र जळगाव संघाने प्रथम फलंदाजी करताना मर्यादित २० षटकांत स्नेहल कुंवर याने ४१, शशिकांत सिरसाट यांनी १६, अभिमन्यू पवार, जितेंद्र पाटील यांच्या प्रत्येकी १९ धावांच्या जोरावर सर्व बाद १५६ धावा केल्या. यात अवांतर ३३ धावांचा समावेश होता. प्रतिस्पर्धी संघाकडून किशोर पवार याने तीन, दीपक माने याने एक गडी बाद केला. प्रत्युत्तरादाखल खेळताना गणेश पवार याच्या शानदार ४४, रशीद शेख याच्या ३४, मनोज तक यांच्या ३२ धावांच्या जोरावर एसआरटीएमयू नांदेड संघाने सहा गड्यांच्या बदल्यात विजयी लक्ष्य गाठले. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या अंगभूत गुणांना वाव मिळावा, खेळातील कौशल्य दाखविता यावे, दैनंदिन कामातून उसंत मिळावी, या उद्देशाने स्पर्धा आयोजिली आहे.

2 MAR 2011 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर क्रीडासंकुलाच्या मैदानावर बुधवारी कुलगुरु चषक टी-२० स्पर्धेचे उद्घाटन करताना खासदार संभाजीराजे छत्रपती. यावेळी शिवाजी विद्यापीठातील अधिकारी, संघातील खेळाडू उपस्थित होते.

## कुलगुरू चषक टी-२० स्पर्धा : विद्यापीठात शानदार उद्घाटन

# नांदेड विद्यापीठाची विजयी सलामी

कोल्हापूर : अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरु चषक टी-२०' क्रिकेट स्पर्धेत बुधवारी झालेल्या उद्घाटनीय सामन्यात स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड)ने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) संघावर ४ गडी राखून विजयी सलामी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर बुधवारी सकाळी या राज्यस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते आणि कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

प्रथम फलंदाजी करताना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) संघाने २० षटकांत सर्वबाद १५६ धावा केल्या. यामध्ये स्नेहल कुवरने ४१, जितेंद्र पाटीलने १९, शशिकांत शिरसाठने १६ धावा केल्या. गोलंदाजीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संघाकडून रशिद शेखने २ गडी बाद केले. गोविंद सोनटक्के, शैलेश कांबळे, जयराम हंबरडे, प्रकाश मुपाडे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

उत्तरादाखल नांदेड संघाने १९.२ षटकांत ६ बाद १५७ धावा केल्या. त्यामध्ये गणेश पवारने ४४, रशीद शेखने ३४, मनोज टाकने ३२ धावा केल्या. गोलंदाजी करताना जळगाव संघाकडून किशोर पवारने ३, दीपक मोरेने एक गडी बाद केला.

प्रारंभी स्पर्धेच्या उद्घाटनानंतर क्रिकेट स्पर्धेत सहभागी विद्यापीठांच्या संघांनी संचालनाद्वारे मान्यवरांना मानवंदना दिली. सागर पवार यांनी संघांना शिस्त व अनुशासनाची शपथ दिली. यावेळी शिवाजी विद्यापीठातील निवृत्त ज्येष्ठ क्रिकेटपटूंचा सत्कार केला.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, 'बीसीयूडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, बाबा सावंत, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष रमेश शिंदे यांच्यासह अधिकारी, प्रशासकीय सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (प्रतिनिधी)

### क्रिकेट हे माझं पॅशन

क्रिकेट हे माझे पॅशन आहे. शिवाजी विद्यापीठाच्या याच मैदानावर मी क्रिकेट खेळलो. कित्येक सामन्यांचा आनंद घेतला. सागर पवारसारखा क्रिकेटपटू मित्र मला याच मैदानावर लाभला, अशा आठवणी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी बुधवारी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी सांगितल्या. खासदार संभाजीराजे यांनी यावेळी मैदानात उतरून उपस्थितांना आपल्या बॅटिंगची चुणूकही दाखविली.

### या संघांचा समावेश....

◆ शिवाजी विद्यापीठ ◆ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ◆ महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी) ◆ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) ◆ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ◆ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड) ◆ मुंबई विद्यापीठ ◆ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशिक) ◆ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ◆ सोलापूर विद्यापीठ ◆ गोंडवाना विद्यापीठ (गडचिरोली) ◆ कुलगुरु इलेव्हन शिवाजी विद्यापीठ हे संघ सहभागी आहेत.

विद्यापीठाच्या क्रिकेट पॅव्हेलियन आणि ॲथलेटिक्स विकेट मैदानावर सकाळी आणि दुपारच्या सत्रात या स्पर्धेतील सामने होतील.

2 MAR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवतेचे प्रतीक

## डॉ. महेशचंद्र गुरू : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय परिषदेची सांगता

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही समाजाच्या तळागाळातील व्यक्तीच्या विकासासाठी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवतेचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. सामाजिक विषमतेतून एकतेचीं प्रेरणा देणारी, मानवतेची शिकवण देणाऱ्या विचारांची बैठक आंबेडकरांच्या पत्रकारितेतून अनुभवण्यास येते, असे प्रतिपादन म्हैसूर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्याशाखा विभागाचे प्रा. डॉ. महेशचंद्र गुरू यांनी केले.



डॉ. महेशचंद्र गुरू

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्याशाखा व जनसंवाद अधिविभागातर्फे आय सीएसएसआर पुरस्कृत जर्नलिस्टिक व्हीवज ऑफ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड इटस् प्रेझेंट रेलवंस या विषयावरील राष्ट्रीय परिषदेची सांगता झाली. ही परिषद वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी सभागृहात पार पडली.

परिषदेत विविध विद्यापीठाच्या संशोधक तसेच विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ. एस. के. कुलकर्णी म्हणाले, ज्या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला, त्या देशात आमचा जन्म झाला हेच आमचे भाग्य. बाबासाहेबांचे कर्तृत्व नेहमीच सर्वांना प्रेरणा देणारे आहे. अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुभाष देसाई, आग्रा विद्यापीठाचे वृत्तपत्र विद्याशाखेचे विभागप्रमुख डॉ. गिरीजा शंकर, काशी विश्वविद्यालय वाराणसीचे डॉ. राममोहन पाठक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे वृत्तपत्र विद्याशाखेचे माजी विभागप्रमुख डॉ. वी. ल. धारूरकर यांनी आपले विचार मांडले.

यावेळी कोलकाता विद्यापीठाच्या डॉ. तपती बसू, हिमाचल प्रदेश विद्यापीठाच्या डॉ. वीरबाला आगरवाल, शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे, प्रा. राजेंद्र पारिजात, संशोधक विद्यार्थी दीपक कुन्नुरे, यांच्यासह विभागाचे कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

2 MAR 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांनी जगाला मानवतेचा मार्ग दाखवला

## डॉ. सुभाष देसाई शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग आयोजित राष्ट्रीय परिषदेचा समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

गौतम बुद्धांच्या विचारांचे पाईक असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चार्तुवर्णाचे समर्थन करणाऱ्या व्यवस्थेला विरोध करत भारतीय राज्य घटनेच्या माध्यमातून देशातील बहुजन समाजाला सामाजिक न्याय दिला. त्यांनी आपल्या ज्ञानाचा वापर हा देशातील बहुजनांच्या उद्धारासाठी केला. अष्टपैलू बहुआयामी व्यक्तीमत्व असणारे डॉ. आंबेडकर हे महान तत्ववेत्ते होते. त्यांनी जगाला मानवतेचा मार्ग दाखवला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत आणि पत्रकार डॉ. सुभाष देसाई यांनी केले.

आयसीएसएसआर पुरस्कृत शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय दृष्टीकोन आणि त्याचे वर्तमानकालीन प्रयोजन'या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. वनस्पतीशास्त्र अधिविभागातील नीलांबरी सभागृहात सोमवारपासून सुरू असलेल्या दोन दिवसीय परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांच्या एकूणच कार्यावर अनेक मान्यवरांनी प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी कोलकाता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या डॉ. तापती बसू होत्या.



**कोल्हापूर : वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग आयोजित चर्चासत्र समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. सुभाष देसाई. सोबत डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरु, डॉ. वीरबाला अग्रवाल, डॉ. गीरीजा शंकर, डॉ. वासंती रासम आदी.**

डॉ. देसाई यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्व आणि कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चार्तुवर्ण व्यवस्थेला विरोध करीत संविधानाच्या माध्यमातून बहुजनांना न्याय दिला. शोषीत व वंचित घटकांना समाज व शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकर भगवान गौतम बुध्दांच्या विचाराचे पाईक होते. त्यामुळे त्यांनी बुध्दांच्या तत्वज्ञानाचे महत्व सर्व देशाला समजावून सांगितले. त्यामुळेच आख्ख्या जगावर डॉ. आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव आहे. कारण डॉ. आंबेडकरांनी कोणा एका जातीधर्माचे नाही तर संपूर्ण बहुजनांचे प्रश्न प्रश्न सोडवून, त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले.

म्हैसूर विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरू म्हणाले, डॉ. आंबेडकरांच्या बुध्दीमतेची किर्ती जगभर प्रसिध्द आहे. विशिष्ट जाती धर्माचा विचार करणारा माणूस महात्मा होऊ शकतो. तर मानवतेचा दृष्टीकोण डोळ्यासमोर ठेवून अंतोदयाचा विचार करणारे डॉ. आंबेडकर हे महात्म्यांचे महात्मे होते. डॉ. आंबेडकर दलितांचे नव्हे तर भारतीयांचे कैवारी होते. म्हणूनच आंबेडकरांची जयंती जगभर साजरी केली जाते. त्यांच्या विचाराने देशाची वाटचाल केली तर देश 'मेक इन इंडिया' किंवा 'मेड इन इंडिया' होण्यास वेळ लागणार नाही. असे सांगून पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर समजून घेवून त्यांच्या विचाराची योग्य मांडणी केली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमांनी झाली. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी शिमला येथील हिमाचल प्रदेश विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख डॉ. वीरबाला अग्रवाल, पुणे विद्यापीठाचे माजी वृत्तपत्र विद्या विभाग प्रमुख डॉ. किरण ठाकूर, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख डॉ. विजय धारूरकर, आग्रा येथील डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ. गिरीजा शंकर, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. सुरेश पुरी, खुल्ताबाद येथील चिस्तीया महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. गणी पटेल, डॉ. ओंकार काकडे, ज्येष्ठ संपादक दशरथ पारेकर, डॉ. वासंती रासम, डॉ. ज.रा. दाभोळे, डॉ. प्रताप पाटील, मयूरा जाधव, डॉ. नंदा पारेकर आदी उपस्थित होते.

2 MAR 2017 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला आंबेडकरांकडून धार देण्याचे कार्य’

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**देशात राजकीय** स्वातंत्र्याची चळवळ जोमात असताना सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे मत कोलकाता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रा. डॉ. तापती बसू यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय दृष्टिकोन आणि त्याचे वर्तमानकालीन प्रयोजन’ या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. बसू बोलत होत्या.

या वेळी व्यासपीठावर काशी बनारस विश्वविद्यालयाचे माजी वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख डॉ. राम मोहन पाठक, शिमला येथील हिमाचल प्रदेश विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख डॉ. वीरबाला अग्रवाल, आग्रा येथील डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ. गिरिजा शंकर, पुणे विद्यापीठाचे माजी वृत्तपत्र विद्या विभाग प्रमुख डॉ. किरण ठाकूर, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख डॉ. विजय धारूरकर, म्हैसूर विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरू, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. सुरेश पुरी, खुल्ताबाद येथील चिस्तिया महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. गणी पटेल उपस्थित होते.

डॉ. आंबेडकर यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये सांगताना डॉ. बसू म्हणाल्या, बाबासाहेबांच्या प्रत्येक वृत्तपत्राच्या नावातच त्यांच्या मनाशी असलेले हेतू सामोरे येतात.

पहिला ‘मूकनायक’ हा दलित, शोषित, पीडित जनतेचा अर्थात ज्या समाजाला स्वतःचा आवाज नव्हता, अशा समाजाला स्वतःचा आवाज मिळवून देणारा हा मूकनायक होता. ‘बहिष्कृत भारत’ हा भारतामधील एक षष्टमांश बहिष्कृत जनतेच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा होता. त्यानंतर ‘जनता’मधून भारतीय जनतेमध्ये एकता व एकात्मतेची जाणीव पेरण्याचा प्रयत्न होता, तर अखेरच्या ‘प्रबुद्ध भारत’ मधून त्यांचे प्रज्ञाशील भारताचे स्वप्न अधोरेखित होते. डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता ही अशा प्रकारे देशाच्या सामाजिक न्याय प्रस्थापनेमधील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा आहे.

चर्चासत्रात डॉ. राम मोहन पाठक, डॉ. वीरबाला अग्रवाल, डॉ. किरण ठाकूर आणि डॉ. विजय धारूरकर यांनी सहभाग घेतला. या वेळी डॉ. ओंकार काकडे, ज्येष्ठ संपादक दशरथ पारेकर, डॉ. वासंती रासम, डॉ. ज. रा. दाभोळे आदी उपस्थित होते.

2 MAR 201 पुढारी

# राज्य जैवविविधता मंडळावर डॉ. ए. डी. जाधव यांची नियुक्ती



**कोल्हापूर : प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य जैव विविधता मंडळावर शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. अधिकराव जाधव यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाने याबाबतचा आदेश मंगळवारी काढला. महाराष्ट्र राज्य जैव विविधता नियम २००८ (सुधारणा २०१६ ) मधील तरतुदीनुसार राज्यात जैव विविधता मंडळ स्थापन करण्यात आले आहे. जैवविविधतेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी, तिचा वापर करताना जैव विविधता टिकून राहील, तसेच जैविक साधन संपत्तीच्या वापरातून प्राप्त झालेल्या लाभांचे समन्यायी वाटप होण्याच्यादृष्टीने पाच अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. जयंत सुधाकर वडतकर, डॉ. अंकुर अरुण पटवर्धन, डॉ. आरती संजय शनावरे, डॉ. विनय दत्तात्रय देशमुख आणि डॉ. अधिकराव धनाजी जाधव यांचा या मंडळाचे सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. या सदस्यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा राहणार आहे.